# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**२०२१**

दिनांक ११.०६.२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई

**मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेकडुन दुचाकी मोटार वाहन चोरी व मोबाईल स्नॅचिंग करणा-या विधीसंघर्षग्रस्त बालकांकडुन सात मोटार सायकल व सहा मोबाईल फोन असा सुमारे ४,३०,०००/-रू. किमतीचा मुद्देमाल हस्तगत. .**

---

मा. पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह, अपर पोलीस आयुक्त डॉ. बी.जी.शेखर पाटील, नवी मुंबई यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील मोटार सायकल चोरी मोबाईल स्नॅचिंग व इतर गुन्हयातील आरोपींचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत विशेष मोहीम राबवुन कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त श्री. प्रविणकुमार पाटील, सहायक पोलीस आयुक्त श्री. विनोद चव्हाण, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली मोहीम सुरू आहे.

मध्यवर्ती कक्षाचे पोलीस अंमलदार लक्ष्मण कोपरकर व राहुल वाघ यांना मिळालेल्या गोपनिय बातमीवरून मोटार सायकल चोरी व मोबाईल स्नॅचिंग करणारे **दोन विधी संघर्ष बालक यांना** दिनांक ०२/०६/२०२१ रोजी उलवे येथुन ताब्यात घेवुन त्यांचेकडे मिळुन आलेल्या मोटार सायकल बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरची मोटार सायकल पनवेल शहर येथुन चोरी केल्याचे कबुली दिली. त्यांचेकडे केलेल्या चौकशीत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील पनवेल, पनवेल तालुका, खांदेश्वर, न्हावाशेवा, खारघर, रबाळे, उरण या पोलीस ठाणेचे हद्दीतुन त्यांनी ८ मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिल्याने त्याच्याकडुन सुमारे ३,३०,०००/-रू. किं. च्या ७ मोटार सायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. तपासादरम्यान त्यांचेकडुन सुमारे ९५,०००/-रू. किं. चे ६ किंमती मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले असुन ते मोबाईल त्यांनी उलवे, सानपाडा, खारघर, कळंबोली वाशी परिसरातुन स्नॅचिंग केल्याचे सांगितले असुन मोटार सायकल व मोबाईल असा एकुण ४,२५,०००/-रू. किं. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांचेकडुन आणखी गुन्हे उघउकीस येण्याची शक्यता असुन अधिक तपास चालु आहे. सदरचे बालअपचारी हे मोटार सायकल चोरी करून त्याचा वापर मोबाईल स्नॅचिंग करीता करत असुन नंतर त्या मोटार सायकल उलवे येथील बामन डोंगरी रेल्वे स्टेशनचे पार्किंगमध्ये सोडुन देत होते.

**सदरची कामगिरी मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एन.बी.कोल्हटकर, सपोनि. राजेश गज्जल, पोउपनिरी. संजय पवार, पोलीस अंमलदार सतिश सरफरे, अतिश कदम, लक्ष्मण कोपरकर, राहुल वाघ, शशिकांत शेंडगे, विष्णु पवार, मेघनाथ पाटील, सतिश चव्हाण यांनी केलेली असुन पुढील तपास मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा हे करीत आहेत.**

( कृ.मागे पहा.)

**मोटार सायकल चोरीचे उघडकीस आलेले ८ गुन्हे**

| अ. क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.क्र. व कलम | मोटार सायकलचे वर्णन |
|---|---|---|---|
| १ | पनवेल शहर | २८४/२१ भादवि ३७९,३४ | ३५,०००/- सुझुकी कंपनीची ॲक्सीस १२५ स्कुटी नं. MH-46-BT-1658 |
| २ | पनवेल शहर | २५२/२१ भादवि ३७९,३४ | ७०,०००/- पियागो कंपनीची आप्रिला मो.सायकल क्र. MH-46-BR-5040 |
| ३ | पनवेल तालुका | १२६/२१ भादवि ३७९,३४ | ४०,०००/- बजाज पल्सर मो.सायकल २२० क्र. MH-46-AN-3007 |
| ४ | खांदेश्वर | ११०/२१ भादवि ३७९,३४ | ९०,०००/- बजाज पल्सर एनएस २०० मो.सायकल क्र. MH-46-BX-3883 |
| ५ | न्हावाशेवा | ८२/२१ भादवि ३७९,३४ | ४०,०००/- मेटॅलिक सुझुकी ॲक्सीस १२५ स्कुटी नं. MH-46-BS-1367 |
| ६ | खारघर | २२९/२० भादवि ३७९,३४ | २५,०००/- सुझुकी ॲक्सीस १२५ स्कुटी नं. MH-46-BS-5215 |
| ७ | रबाळे | १५२/२१ भादवि ३७९,३४ | ३०,०००/- सुझुकी ॲक्सीस १२५ स्कुटी नं. MH-43-BT-7011 |
| ८ | उरण | १३९/२१ भादवि ३७९,३४ | बेवारस मिळुन आल्याने उरण पो.ठा. येथे जमा आहे. |
| **एकुण** | | **७ मोटार सायकल** | **३,३०,०००/-रू. किंमत** |

**मोबाईल स्नॅचिंग मधील हस्तगत करण्यात आलेले मोबाईल**

| अ.क्र. | किंमत | मोबाईलचे वर्णन | IMEI नंबर | स्नॅचिंगचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | ५,०००/- | ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन | 865557704973735l<br>865557704973734O | उलवे |
| २ | १०,०००/- | सॅमसंग गॅलेक्सी ऐ ६+ कंपनीचा मोबाईल फोन | 356553094548334<br>356554094548332 | सानपाडा |
| ३ | १०,०००/- | सॅमसंग गॅलेक्सी ऐ ७ कंपनीचा मोबाईल फोन | 351578101679744<br>351579101679742 | खारघर |
| ४ | ३०,०००/- | आयफोन ७+ कंपनीचा मोबाईल फोन | 359160079615505 | कळंबोली |
| ५ | १५,०००/- | सॅमसंग अे२१ एस कंपनीचा मोबाईल फोन | 350215310137054<br>354861360137050 | वाशी |
| ६ | २५,०००/- | वन + कंपनीचा मोबाईल फोन | --- | खारघर |
| **एकुण** | **९५,०००/- रू. किंमतीचे ६ मोबाईल फोन** | | | |

★★★★★★★★★★